पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 24/02/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा आमडी फाटा एनएच 7 येथे दिनांक 23/02/2020 चे 07.30 वा. ते 08.30 वा. दरम्यान पारशिवनी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन पारशिवनी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/ बीयल – 4989 क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासले असता त्यामध्ये एकुण 24 (गाई, बैल) कि. 2,88,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– 1) मो.साजिद वल्द मो.सादीक, वय 33 वर्ष, रा. जयप्रकाश वार्ड, कटंणी रोड सिवनी(म.प्र) याच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 22,88,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. 2) कादर खान, रा. खवासा जिल्हा (म.प्र) व 3) एम. एच.– 40/बीयल –4989 क्रमांकाच्या 10 चाकी ट्रकचा मालक हे दोन्ही आरोपी फरार आहेत.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. संदीप कडु, पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(ड)(इ)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)9,11 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 34 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उबाळे 8830332007 हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्रीमती मोनिका राऊत प्रभारी पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. विलास चव्हाण, पोउपनि श्री. उबाळे, पोलिस नाईक मुदस्सर जमाल, संदीप कडू, नंदु सिडाम, अलिफ ढबाले, पोलिस शिपाई बादल गिरी यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर